सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - ७९ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. २ मे २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४


## अमरावती विभागाची राज्यात तिसऱ्या स्थानी झेप, ९०.९२ टक्के निकाल

### गतवर्षीच्या तुलनेत क्रमवारीत पाचव्या स्थानावरून तिसऱ्या स्थानी झेप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती-** उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेचा म्हणजेच इयत्ता बारावीचा अमरावती विभागाचा निकाल ९०.९२ टक्के लागला असून उत्तीर्णतेच्या टक्केवारीत नऊ विभागीय मंडळांमध्ये अमरावती विभाग तिसऱ्या स्थानी आहे. गेल्या वर्षी अमरावती विभागाचा निकाल ९१.४३ टक्के लागला होता, यंदा त्यात ०.४१ टक्क्यांची किंचित घसरण झाली असली, तरी क्रमवारीत पाचव्या क्रमांकावरून तिसऱ्या स्थानी झेप घेतली आहे.

निकालाच्या टक्केवारीत विभागात गेल्यावर्षी प्रमाणे यंदा बुलढाणा जिल्ह्याने अव्वल स्थान मिळवले असून या जिल्ह्याचा निकाल ९५.२२ टक्के, वाशीम ९१.१५, अकोला ९०.१४, यवतमाळ ८९.६९ तर अमरावती जिल्ह्याचा निकाल सर्वात कमी ८८.२६ टक्के लागला आहे. मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेसाठी अमरावती विभागातून एकूण १ लाख ४८ हजार ९३१ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. प्रत्यक्षात १ लाख ४७ हजार




७५४ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. एकूण १ लाख ३४ हजार ३५२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. उत्तीर्णतची टक्केवारी ९०.९२ इतकी आहे.

अमरावती विभागाचा विज्ञान शाखेचा निकाल ९७.४८ टक्के, कला शाखेचा ८१.३३ टक्के, वाणिज्य शाखेचा ८९.८७ टक्के तर व्यवसाय अभ्यासक्रमाचा निकाल ७५.८७ टक्के तर आयटीआय शाखेचा निकाल ९०.४० टक्के इतका लागला आहे.

**जिल्हानिहाय निकाल**

- बुलढाणा: ९५.२२ टक्के
- वाशीम: ९१.१५ टक्के
- अकोला : ९०.१४ टक्के
- यवतमाळ : ८९.६९ टक्के
- अमरावती ८८.२६ टक्के
- एकूण : ९०.९२ टक्के

**शाखानिहाय टक्केवारी**

- विज्ञान : ९७.४८ टक्के
- वाणिज्य : ८९.८७ टक्के
- कला : ८१.३३ टक्के
- व्यवसाय अभ्यासक्रम: ७५.८७ टक्के
- आयटीआय : ९०.४० टक्के

यंदाही मुलींचाच वरचष्मा उत्तीर्णतेच्या बाबतीत यंदा देखील मुलींनीच बाजी मारली आहे. अमरावती विभागातून एकूण ६८ हजार ८४४ मुलींनी परीक्षा दिली, त्यापैकी ६४ हजार ६८१ विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या. हे प्रमाण ९३.९५ टक्के आहे, तर ७८ हजार ९१० मुलांनी परीक्षा दिली, त्यापैकी ६९ हजार ६७१ मुले उत्तीर्ण झाले. मुलांच्या उत्तीर्णतेची टक्केवारी ही ८८.२९ इतकी आहे.

विद्यार्थ्यास गुणपडताळणी आणि उत्तरपत्रिकांच्या छायाप्रती, पुनर्मूल्यांकनासाठी संबंधित विभागीय मंडळाकडे ऑनलाईन पद्धतीने मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळवरून स्वतः किवा कनिष्ठ महाविद्यालयामार्फत अर्ज करण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. गुणपडताळणीसाठी आणि उत्तरपत्रिका छायाप्रतीसाठी ३ मे ते १७ मे २०२५ पर्यंत अर्ज ऑनलाईन पद्धतीने करता येणार आहे.

## परिस्थितीची गरज म्हणून निर्णय

### बच्चू कडूंचा स्पष्टवक्तेपणा, संजय राऊतांवर जोरदार टीका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२ अमरावती** शिवसेनेत (शिंदे गट) प्रवेशानंतर बच्चू कडू यांनी आपल्या भूमिकेबाबत स्पष्ट भाष्य करत हा निर्णय परिस्थितीमुळे घ्यावा लागल्याचे सांगितले. ही केवळ सोय नव्हती, तर परिस्थितीची गरज होती, असे ते म्हणाले. त्यांच्या या विधानामुळे त्यांच्या राजकीय निर्णयामागील कारणांबाबत स्पष्टता निर्माण झाली आहे.यावेळी त्यांनी खासदार संजय राऊत यांच्यावरही जोरदार टीका केली. आम्ही काही मुंबई-दिल्लीवाल्यांचे गुलाम नाही, असे स्पष्ट शब्दांत सांगत त्यांनी आपली भूमिका ठामपणे मांडली. ज्यांना ते नेते मानत होते, त्यांनाच आपण राजकारणात उभे केले, मात्र त्यांच्याकडूनच गुलाम बनवण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप त्यांनी केला. त्यामुळेच आता स्वतंत्र भूमिका घेण्याची



वेळ आल्याचे त्यांनी नमूद केले.शिवसेनेत सामील झाल्यानंतर पक्षाचा झेंडा आणि 'धनुष्यबाण' हे चिन्ह त्यांनी सन्मानपूर्वक स्वीकारल्याचे सांगितले. ही शिवसेना सर्वांची असून सर्वसामान्यांना सोबत घेऊन चालणारी आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले. विशेषतः कष्टकरी व श्रमिक वर्गाला शिवसेना आपली वाटली पाहिजे, यासाठी आपण प्रामाणिकपणे काम करणार असल्याचा विश्वास त्यांनी दिला.अचलपूर विधानसभा मतदारसंघाबाबत बोलताना बच्चू कडू यांनी तो आपला हक्काचा मतदारसंघ असल्याचे ठामपणे सांगितले. आगामी निवडणूक कोणत्या पक्षाकडून लढवणार, याबाबत त्यांनी थेट संकेत देत आपल्या राजकीय उपस्थितीची जाणीव करून दिली.राजकारणातील सध्याच्या प्रवृत्तीवर भाष्य करताना त्यांनी जात, धर्म, पंथ आणि पैशाच्या आधारावर होणाऱ्या राजकारणावर टीका केली. अशा प्रवृत्तींविरोधात लढा देण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच सर्व थोर पुरुषांच्या विचारांचा सन्मान राखत पुढे जाण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.बच्चू कडू यांच्या या भूमिकेमुळे त्यांच्या पुढील राजकीय वाटचालीकडे सर्वांचे लक्ष लागले असून, त्यांच्या वक्तव्यामुळे राज्यातील राजकारणात नव्या चर्चांना सुरुवात झाली आहे.

## कडूंनी जिवंत समाधी घेतली

### शिंदे सेनेत विलीन होताच बच्चू कडूंवर ठाकरे सेनेचा प्रहार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२ मुंबई**
प्रहार संघटनेचे बच्चू कडू यांनी शिवसेनेचा धनुष्यबाण हाती घेतला आहे. त्यांना विधान परिषदेचेही उमेदवारी मिळाली आहे. बच्चू कडू यांनी त्यांचा प्रहार पक्ष शिवसेनेत विलीन केल्याने त्यांच्यावर राजकीय टीकाही होऊ लागली आहे. शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे मुखपत्र असलेल्या सामनामधून बच्चू कडूंच्या या निर्णयावर टीका करण्यात आली असून एकनाथ शिंदेंनाही यात लक्ष्य करण्यात आलं आहे.

**बच्चू कडूंनी जिवंत समाधी घेतली**

बच्चू कडू महाविकास आघाडीत मंत्री होते. मात्र एकनाथ शिंदेंनी बंड पुकारल्यानंतर ते त्यांच्याबरोबर गेले. मात्र, मधल्या काळात त्यांनी केंद्र सरकारवर सातत्याने टीका-टिप्पणी सुरू ठेवली होती. त्यामुळे आपण शिंदे गटात जाणार नसल्याचं त्यांनी




दोनच दिवसांपूर्वी सांगितलं होतं, त्यावर सामनातून आता टीका करण्यात आली आहे. अग्रलेखात म्हटलंय, अमरावती विभागात बराच काळ आमदार व मंत्री असलेले श्रीमान बच्चू कडू यांनी स्वतःला मिंधे गटात विलीन करून जिवंत समाधी घेतली. या समाधी सोहळ्यास स्वतः उपमुख्यमंत्री मिंधे व कडू यांचे अनुयायी हजर होते. कडू यांचा हा समाधी व समर्पणाचा सोहळा आटपल्यावर त्यांचा राजकीय वैकुंठाचा प्रवास सुरळीत व्हावा यासाठी त्यांचे नवे गुरू महाराज मिंधे यांनी कडू महाराजांना विधान परिषदेची उमेदवारी दिली. त्यामुळे समाधी अवस्थेत कडू यांना देव दिसला.

**बच्चू कडूंचं खरं रुप दिसलं**

कडू हे विधानसभा निवडणूक हरले तेव्हापासून ते पाण्याबाहेर पडलेल्या माशाप्रमाणे तडफडताना दिसत होते. एका सामाजिक कार्यकर्त्याची ही तडफड समाजाला अस्वस्थ करणारी आहे. कडू यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी मोर्चे काढले, आंदोलने केली. दिव्यांगांच्या, वंचितांच्या प्रश्नांवर सतत आवाज उठवला. त्यांच्या प्रहार संघटनेचे कार्यकर्ते महाराष्ट्रात काम करीत होते. उद्धव ठाकरे यांच्या मंत्रिमंडळात ते मंत्री होते, पण मिंधे गट फुटला व सरकार पडले तेव्हा हा 'सेवाभावी' कार्यकर्ता सुरत, गुवाहाटी, गोवा अशी तीर्थयात्रा करून महाराष्ट्रात परतला व गंगेत डुबकी मारून आल्याचा आनंद घेत सरकारदरबारी फिरत राहिला. त्यामुळे लोकांना त्यांचे खरे रूप दिसले, अशी टीकाही सामनातून करण्यात आली.

## आता संघर्ष टोकाचा होणार आमच्याशी वाकडे वागाल तर ....

### जशास तसे उत्तर आम्ही देऊ - आ. प्रवीण तायडे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २ परतवाडा**
अमरावती: अचलपूरचे भाजपचे आमदार प्रवीण तायडे आणि नुकतेच शिवसेना शिंदे गटात प्रवेश करणारे माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांच्यातील संघर्ष वाढण्याची चिन्हे आहेत. तायडे यांनी पुन्हा एकदा कडू यांच्यावर तिखट शब्दात हल्ला चढवला आहे. बच्चू कडू यांना पैसाच प्यारा आहे. त्यांनी प्रचंड माया जमवली आहे. शेतकरी, शेतमजूर, दिव्यांगांचे आंदोलन हे केवळ आमदारकी मिळवण्यासाठी केलेले नाटक होते. पाचव्यांदा ते निवडून आले असते, तर या ठिकाणी वाल्मिक कराड जन्माला आला असता, अशी प्रखर टीका प्रवीण तायडे यांनी बच्चू कडू यांचे नाव न घेता केली.

प्रवीण तायडे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने शुक्रवारी रात्री परतवाडा येथे अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बोलताना तायडे यांनी बच्चू कडू यांच्याविषयी अनेक अपशब्दही वापरले.



**आयुष्यात एवढी मोठी झापड नसेल खाल्ली, तेवढी मारल्याशिवाय राहणार नाही..**

प्रवीण तायडे म्हणाले, वीस वर्षे आमदार होतात, तुम्हाला लाज वाटायला हवी. तुम्ही लोकांची लाज काढता. त्याच लोकांनी तुम्हाला निवडून दिले होते आणि त्याच लोकांनी तुमचा पराभव केला. तुम्ही लोकांना मेंढरं म्हणता. तुम्हाला पाहिजे 'टोप्या'. आता कुठे गेल्या टोप्या. आता तुम्हाला हिंदुत्व स्वीकारावे लागणार आहे ना. आता तर 'भगवे की शान मे अमूक अमूक मैदान मे' असे म्हटल्याशिवाय जमणार नाही. जे म्हणत होते, आम्हाला विधान परिषद नको, आम्ही भीक मागणार नाही, आता त्यांनी तर पक्षच विलीन केला आहे.

आमदार प्रवीण तायडे म्हणाले, आता संघर्ष टोकाचा होणार आहे. आमच्याशी वाकडे वागाल तर जशास तसे उत्तर आम्ही देऊ. आयुष्यात एवढी मोठी झापड नसेल खाल्ली, तेवढी मारल्याशिवाय राहणार नाही. लोकांनी आता सज्ज रहावे. सतर्क, सज्ज रहावे. राजकारण हे खेळीमेळीचे असले पाहिजे, ते खुनशी नसावे. इथे तर एखादा राजकारणी अपघातात जखमी होऊन पडला, तर त्याला हे उचलणारही नाहीत. इतके खालच्या स्तराचे राजकारण या मतदारसंघात आहे.

## विदर्भ राज्याची चाहूल तर नाही ना ?

### मुख्यमंत्री मंत्र्यांच्या बंगल्यांपासून अधिकाऱ्यांना हायराइज इमारत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२ नागपूर :**
उपराजधानी नागपूरमध्ये सुरू असलेल्या मोठ्या पायाभूत बदलांमुळे स्वतंत्र विदर्भ राज्याच्या चर्चांना पुन्हा उधाण आले आहे. नवीन विधानभवन, मुख्यमंत्री निवासस्थानातील बदल, मंत्र्यांच्या बंगल्यांचे पुनर्निर्माण आणि अधिकाऱ्यांसाठी नव्या निवासस्थानांची उभारणी वेगाने सुरू असल्याने या हालचालींकडे विशेष लक्ष वेधले जात आहे. परिसीमनाच्या पार्श्वभूमीवर हे बदल होत असल्याचे सांगितले जात असले, तरी गेल्या काही वर्षांत 'नवीन नागपूर' सह अनेक उपनगरे जोडली शहराचा विस्तार राजधानीसारखा झाला आहे.

विधानभवनाच्या नागपूर



विस्तारीकरणासाठी राज्य सरकारने ६६२.८९ कोटींसह अतिरिक्त ३३९.७८ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. नव्या इमारतीत विधानसभा (४००), विधानपरिषद (१२०) आणि सेंट्रल हॉल (७००) अशी आसनक्षमता असेल. अंडरग्राउंड पार्किंगची सोय राहील. विद्यमान सभागृहांचा वापर मीटिंग हॉलसाठी केला जाणार असून, प्रशासकीय इमारत मुद्रणालयाच्या जागेवर उभारली जाईल. मुंबईत आधीच सेंट्रल हॉल असताना नागपूरमध्ये त्याची उभारणी अनेक अर्थांनी महत्त्वाची मानली जाते.

**विदर्भवादी काय म्हणत आहेत ?**

नागपूरमध्ये सर्व पायाभूत सुविधा विकसित होत आहेत. हे एका राज्याच्या राजधानीसाठी अत्यंत योग्य आहे. एवढेच नाही तर दिल्लीतील वाढते प्रदूषण आणि सामरिक समस्या पाहता नागपूरला देशाची राजधानीच बनवून टाकायला हवे.

-डॉ. संजय खडक्कार, माजी विशेषज्ञ सदस्य, विदर्भ वैधानिक विकास मंडळ.

रवीनगरमध्ये अधिकाऱ्यांसाठी जी १५ मजली इमारतीसाठी ४३.३० कोटी मंजूर झाले आहेत, तर हैदराबाद हाऊसमधील जुन्या बॅरेक्सचे सुदृढीकरणही प्रस्तावित आहे. सुयोग गेस्ट हाऊसची क्षमता वाढवण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे.

**रवी भवन नाग भवनचा मेकओव्हर-** रवी भवनच्या उन्नतीकरणासाठी २५.३० कोटी मंजूर असून ३० आलिशान सूट, लँडस्केप आणि सुधारित कॉटेज उभारले जाणार आहेत. रामगिरी येथे सुमारे २०० आसनक्षमतेचा मीटिंग हॉल उभारण्याचा आराखडा तयार होत आहे. नाग भवनच्या मेकओव्हरसाठी ११६.६५ कोटींची तरतूद असून येथे व्हीव्हीआयपी सूट, कॉन्फरन्स हॉल, जिम, स्पा आणि इतर सुविधा असतील.

## प्रत्येकाला पक्ष वाढवण्याचा अधिकार, २०२९ मध्ये शिवसेना -भाजपा स्वबळावर लढू शकते; संजय शिरसाट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२मुंबई-** प्रत्येक पक्ष हा आपआपल्या पद्धतीने तयारी करत असतो, भाजपा स्वबळावर लढणार का? लढू शकते, शिवसेना स्वबळावर लढणार का? तर लढू शकते. यात गैर काहीच नाही. एका जागेसाठी युती तुटताना आम्ही पाहिली आहे, म्हणूनच प्रत्येक पक्ष आपापल्या पद्धतीने तयारी करत असतो, असे विधान मंत्री संजय शिरसाट यांनी केले. 'सामना' दैनिकातून करण्यात आलेल्या काही दाव्यांना उत्तर देताना ते बोलत होते.

राजकारणात कधी बॉन्ड नसतो. राजकारणात कधीही काहीही होऊ शकतो, असेही ते म्हणाले. यावेळी संजय शिरसाट यांनी यावेळी शिवसेना (उद्धव ठाकरे ) गटावर टीका केली. ते म्हणाले, उद्या जर 'उबाठा'ला असे वाटत असेल की कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी त्यांना सोबत राहणार आहे आणि पुन्हा त्यांच्या नेत्याला ते मुख्यमंत्री करतील, तर ते केवळ



स्वप्नात वावरत आहेत. स्वप्न पाहण्यापेक्षा त्यांनी वास्तविकतेला समोर गेले पाहिजे. आम्ही येणारे कोणतेही संकट किंवा आव्हान स्विकारण्याची ताकद शिवसेनेत आहे, असेही शिरसाट म्हणाले.

दुसऱ्यावर टीका करून आपला पक्ष मोठा होत नाही, असे सांगताना शिरसाट पुढे म्हणाले, आम्ही कोण काय करतंय यापेक्षा आमचा पक्ष कसा पुढे नेता येईल, याचीच चिंता करत असतो. स्वतःचा पक्ष वाढवण्यासाठी कोणालाही कोणीही थांबवलेले नाही., असेही शिरसाट म्हणाले.

बच्चू कडू यांनी विचारपूर्वक शिवसेनेत सामील होण्याचा निर्णय घेतल्याचे सांगत शिरसाट म्हणाले, कडू यांना आगामी राजकारणाची दिशा माहित आहे. त्यांनी आधी कॉंग्रेससोबत केलेला घरोबा ही काय आत्महत्या नव्हती का? त्यांनी कॉंग्रेससोबत केवळ संगत केली नव्हती तर 'शय्या' केली होती., असा टोलाही शिरसाट यांनी लगावला.

## संपादकीय ......

# सर्वांगीण विकासात महाराष्ट्र अव्वल

महाराष्ट्र दिनाच्या महाराष्ट्रातील आणि जगभरातील मराठी बांधवांना मनापासून शुभेच्छा. आज कामगार दिनसुद्धा आहे, सर्व कामगार बंधू, भगिनींनाही मन:पूर्वक शुभेच्छा!

महाराष्ट्र केवळ भौगोलिक सीमांनी बांधलेले राज्य नाही. महाराष्ट्र म्हणजे इतिहास, भूगोल आणि संस्कृतीचा समुच्चय आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांनी दिलेली स्वराज्याची प्रेरणा, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घालून दिलेला न्याय आणि प्रज्ञेचा पाया, संतांच्या अभंगवाणीचा दिव्य वारसा, महात्मा जोतिराव फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी पेटविलेली शिक्षण आणि समतेची मशाल, लोकमान्य टिळक यांनी जागविलेली राष्ट्रभावना, देशासाठी अनन्यसाधारण यातना सहन करण्याची ताकद देणारे स्वातंत्र्यवीर सावरकर या सगळ्यांच्या विचारांचा एकत्रित संगम म्हणजे महाराष्ट्र. केवळ भौगोलिक रचनेत महाराष्ट्र व्यक्त होत नाही तर महाराष्ट्र धर्मातून महाराष्ट्र प्रकट होतो. सर्वांवर हा महाराष्ट्र धर्म जगभरात वर्धिष्णू करण्याची जबाबदारी आहे.

महाराष्ट्र केवळ भौगोलिक सीमांनी बांधलेले राज्य नाही. महाराष्ट्र म्हणजे इतिहास, भूगोल आणि संस्कृतीचा समुच्चय आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांनी दिलेली स्वराज्याची प्रेरणा, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घालून दिलेला न्याय आणि प्रज्ञेचा पाया, संतांच्या अभंगवाणीचा दिव्य वारसा, महात्मा जोतिराव फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी पेटविलेली शिक्षण आणि समतेची मशाल, लोकमान्य टिळक यांनी जागविलेली राष्ट्रभावना, देशासाठी अनन्यसाधारण यातना सहन करण्याची ताकद देणारे स्वातंत्र्यवीर सावरकर या सगळ्यांच्या विचारांचा एकत्रित संगम म्हणजे महाराष्ट्र. केवळ भौगोलिक रचनेत महाराष्ट्र व्यक्त होत नाही तर महाराष्ट्र धर्मातून महाराष्ट्र प्रकट होतो. सर्वांवर हा महाराष्ट्र धर्म जगभरात वर्धिष्णू करण्याची जबाबदारी आहे.

यंदाचा महाराष्ट्र दिन विशेष आहे. महात्मा फुले यांच्या २०० व्या जयंतीचे हे वर्ष आहे, संत गाडगे महाराज यांच्या १५० व्या जयंतीचे वर्ष आहे, चवदार तळ्याच्या ऐतिहासिक लढ्याचे शताब्दी वर्ष आहे. हे वर्ष आपण 'समता आणि सामाजिक समरसता' वर्ष म्हणून साजरे करत आहोत. आज जग आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या संघर्षाची झळ सोसत आहे. त्याचवेळी आपले लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारत सरकारने ऊर्जा सुरक्षेसाठी, पर्यायी तेल स्रोतांसाठी आणि सौर ऊर्जेच्या विस्तारासाठी उभारलेल्या कामामुळे जगातील अन्य देशांना ज्या परिस्थितीला तोंड द्यावे लागले, तसे भारतात झाले नाही.

जगात कितीही आव्हाने असताना महाराष्ट्र खंबीरपणे उभा आहे. महाराष्ट्र देशाच्या जीडीपीमध्ये १३.५ टक्क्यांहून अधिक योगदान देत आहे. २०२४-२५ मध्ये महाराष्ट्राने १,६४,८७५ कोटी रुपयांची थेट परकीय गुंतवणूक आकर्षित केली. हे प्रमाण देशात आलेल्या एकूण एफडीएच्या ३९ टक्के इतके आहे. दावोसमधील वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये महाराष्ट्राने ३० लाख कोटींचे सामंजस्य करार केले, ज्यातून ४० लाख रोजगार निर्माण होणार आहेत. जगात आर्थिक समस्या असताना महाराष्ट्राने जगातील ३० वी अर्थव्यवस्था म्हणून झेप घेतली आहे.

यावर्षी एल-निनो परिस्थितीमुळे २०२६ च्या हंगामातील पाऊस सरासरीपेक्षा कमी असेल, असा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. आपला खरीप हंगाम पूर्णपणे पावसावर अवलंबून आहे. त्यामुळे हा अंदाज गांभीर्याने घेणे आवश्यक आहे. पेरणीची घाई करू नका. कृषी विभागाकडून येणाऱ्या प्रत्येक सूचनांकडे लक्ष द्या. त्यातून या संकटापासून बचाव करणे सोपे जाईल. त्याचवेळी मला शेतकरी बांधवांना आश्वस्त करायचे आहे की, राज्य शासन म्हणून आम्ही आधीपासूनच पाणी, चारा याचे नियोजन प्रारंभ केले आहे. जलयुक्त शिवार, गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवारच्या कामांना गती देण्यास तसेच त्यासाठी प्राधान्याने निधी देण्यास सांगण्यात आले आहे.गेल्या वर्षी पूर आणि अतिवृष्टीमुळे बाधित शेतकऱ्यांच्या खात्यावर १५,५७६ कोटी रुपये जमा केले गेले. शेतकऱ्यांसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना आपण जाहीर केली आहेच. शेतकऱ्यांना मोफत वीज दिली जात आहे, आता सौर ऊर्जेचा मोठा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. नैसर्गिक कितीही संकटे आली तरी महाराष्ट्राच्या विकासाचा रथ थांबणार नाही. विकसित महाराष्ट्राचा आराखडा आपण तयार केला आहे. महाराष्ट्राला २०४७ पर्यंत ५ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनवण्याचे स्वप्न आणि त्या दिशेने आपण आतापासूनच काम सुरू केले आहे.

# डिजिटल व्हॅल्युएशनकडे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा मोठा टप्पा ; ४५ दिवसांत निकालाचे लक्ष्य

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२अमरावती :** सात गाडगे बाबा अमरावती विद्यापीठा ने परीक्षा व निकाल प्रक्रियेत पारदर्शकता आणि गती आणण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेत 'डिजिटल व्हॅल्युएशन' प्रणाली लागू करण्याचे पाऊल उचलले आहे. या नव्या प्रणालीमुळे पारंपरिक पद्धतीने उत्तरपत्रिका तपासण्याऐवजी त्यांची डिजिटल स्वरूपात तपासणी केली जाणार असून, निकाल केवळ ४५ दिवसांत जाहीर करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.विद्यापीठ प्रशासनाने 'रूसा' (ठणड-) योजनेअंतर्गत अद्ययावत डिजिटल मूल्यांकन केंद्र उभारण्याची प्रक्रिया सुरू केली असून, ३० एप्रिल रोजी या प्रकल्पासाठी ई-निविदा काढण्यात आली आहे. या निर्णयामुळे परीक्षा व्यवस्थापनात मोठा बदल होणार असून, विद्यार्थ्यांना वेळेत निकाल मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.नवीन प्रणालीअंतर्गत विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका सर्वप्रथम स्कॅन करून त्यांची डिजिटल प्रत तयार केली जाईल. ही प्रत संगणकाद्वारे विषयतज्ज्ञ प्राध्यापकांकडे पाठवली जाईल. विशेष म्हणजे, प्राध्यापकांना आता अमरावती येथे प्रत्यक्ष उपस्थित राहण्याची गरज भासणार नाही. ते आपल्या नजीकच्या केंद्रातून किंवा अधिकृत लिंकद्वारे ऑनलाइन पद्धतीने उत्तरपत्रिका तपासू शकतील.अमरावतीसह अकोला, यवतमाळ, बुलढाणा आणि वाशीम या पाच जिल्ह्यांत स्वतंत्र डिजिटल व्हॅल्युएशन केंद्रे उभारली जाणार आहेत. ही केंद्रे प्रामुख्याने नजीकच्या अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये स्थापन करण्यात येणार आहेत. कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांच्या मार्गदर्शनाखाली प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे आणि कुलसचिव अविनाश असनारे यांच्या समन्वयातून ही प्रणाली कार्यान्वित केली जात आहे.डिजिटल व्हॅल्युएशन प्रणालीमुळे मानवी चुका टाळण्यास मोठी मदत होणार



आहे. गुणांची बेरीज करताना होणाऱ्या त्रुटी, एखादा प्रश्न तपासायचा राहणे अशा समस्या आता दूर होतील. ऑनलाइन पद्धतीने तपासणी झाल्यामुळे निकाल प्रक्रियेत अचूकता आणि पारदर्शकता वाढणार आहे.यासोबतच विद्यार्थ्यांसाठीही ही प्रणाली अत्यंत लाभदायक ठरणार आहे. पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज केल्यानंतर विद्यार्थ्यांना त्यांच्या उत्तरपत्रिकेची स्कॅन केलेली प्रत थेट ई-मेलवर उपलब्ध करून दिली जाणार आहे. त्यामुळे उत्तरपत्रिका पाहण्यासाठी किंवा प्रती मिळवण्यासाठी होणारी प्रतीक्षा संपुष्टात येईल.निकाल वेळेत लागल्यामुळे विद्यार्थ्यांच्या करिअरच्या दृष्टीनेही हा निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे. प्लेसमेंट प्रक्रिया, परदेशात शिक्षणासाठी अर्ज किंवा पुढील प्रवेश प्रक्रिया यामध्ये कोणताही विलंब होणार नाही. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाचविण्यासाठी ही प्रणाली उपयुक्त ठरेल.या नव्या पद्धतीनुसार 'मिशन ४५ दिवस' राबवण्यात येणार असून, परीक्षेनंतर अवघ्या ४५ दिवसांत निकाल जाहीर करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. तसेच प्राध्यापकांचा प्रवासाचा वेळ वाचून कार्यक्षमतेत वाढ होणार आहे.परीक्षा नियंत्रक संचालक डॉ. नितीन कोळी यांनी सांगितले की, डिजिटल व्हॅल्युएशनमुळे विद्यापीठ कायद्यानुसार निर्धारित वेळेत निकाल जाहीर करणे शक्य होणार आहे. यामुळे पारदर्शकता, अचूकता आणि वेग या तिन्ही बाबींमध्ये सुधारणा होईल.एकूणच, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा हा निर्णय परीक्षा व्यवस्थापनात आधुनिकतेकडे टाकलेले महत्त्वाचे पाऊल मानले जात असून, विद्यार्थ्यांसाठी तो दिलासादायक ठरणार आहे.

# आझाद हिंद मंडळाच्या वतीने स्वर्गीय सोमेश्वर पुसतकर यांचे स्मृती प्रित्यर्थ रक्तदान शिबिर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२ अमरावती: -** स्थानिक आझाद हिंद मंडळ बुधवारा अमरावतीच्या वतीने मंडळाचे दिवंगत सदस्य , शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख, तथा विदर्भातील प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते स्वर्गीय सोमेश्वर पुसतकर यांचे स्मृती प्रित्यर्थ दिनांक १ मे २०२६ रोजी महाराष्ट्र दिनाच्या औचित्य साधून भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.**रक्तदान शिबिराचे उद्घाटन स्वर्गीय सोमेश्वर पुसदकर यांच्या प्रतिमेचे पूजन मंडळाचे कार्याध्यक्ष श्री विलास इंगोले माजी महापौर, तथा विरोधी पक्ष नेते मंडळाचे सहसचिव ज्ञानेश्वर हिवसे, यांचे हस्ते व महानगर पालिका मधील शिक्षक बंधू भगिनीं यांचे उपस्थितीत झाले. त्या नंतर रक्तदान कार्यक्रमाला सुरवात झाली.या प्रसंगी स्वीकृत नगरसेवक पदी निवड झाल्या बद्दल श्री अनिलभाऊ अग्रवाल, व जिल्हा नियोजन समिती चे सदस्य श्री सुनिल खराटे व श्री संतोष बद्रेयांची निवड झाल्या बद्दल मंडळाच्या वतीने त्यांच्या यथोचित सत्कार करण्यात आला. बॅडमिंटन खेळाडू माधुरी खडसे हिचा देखील सत्कार करण्यात आला.रक्तदान शिबिरला माजीखासदार श्री अनंतराव गुढे स्थायी समिती सभापती विवेक कलोती डॉ पंजाबराव देशमुख बँकेचे संचालक श्री राजूभाऊ महल्ले, अभय ढोबळे,श्री सुभाष दादा पावडे अविनाश दुधे , दिलीप कलोती, ड.आशीष लांडे नंदू गुबले नितीन सराफ प्रवीण पाटील संजय मुचळंबे, भूषण पुसतकर पंकज लुंगीकर निलेश कारंजकर रेवन पुसतकर निलेश सराफ संतोष चिखलकर मयूर जलतारे राजगुरू हिंगमिरे वेदांत डांगे बबलू खडेकार, अविनाश भडांगे मनोज केवले, वैभव दलाल धनराज यादव विजू अटालकर, प्रभाकर वाळसे,सुनिल आसलकर,



महेश गट्टानी सुनील महाले विजया खुले वैशाली परतेकी, विजय खंडारे अभिनंदन पेंडारी दीपक हुंडीकर, सुरेश रतावा, रशीद भाई, रफिक भाई चिक्कू वाले, डॉ. संजय शिरभाते, जयंत कलोती, प्रा., प्रवीण सोइतकर, सागर इंगोले राजू भेले अण्णा कर्णे राजू हिरपूरकर, बाळासाहेब उडाखे, प्रमोद इंगोले ,बाळासाहेब कर्णे, अजय पुसतकर,अजिंक्य जवंजाळ, सखाराम जोशी राजू पाचगडे, शिवम हेगु संजय संगेकर श्याम शिंगारे प्रा. आकाश मोरेअरुण गुहे रघुनाथ निमगावकर संजय हिरपूरकर, राजेश जायदे, प्रविण चौधरी, राजेश ढोले, रामा वळसे जगदीश पतंगराव आकाश हिवसे, मनीष चौधरी, चेतन गुंबळेआर्यन ढोले, बाळ वानखडे,कृष्णा हिवसे, वेदांत डांगे राजा पिंजरकर अनुराग वाडेकर अद्वत बोराटे तन्मय पिंजरकर आकाश तूपटकर आझाद हिंद महिला मंडळ योग शिबिरातील प्रशिक्षक श्री मनीष देशमुख व महिला सदस्य देखील उपस्थित होत्या तसेच दत्तात्रय पुसतकर महाविद्यालयाचे प्राचार्य विजय दरने, डॉ . गोविंद तिरमनवार, डॉ . पंकज मोरे, डॉ . पी आर जाधव,, सचिव श्रीकृष्ण बाळापुरे तसेच रक्तदान समितीचे महेंद्र भुतडा अजय दातेराव संदीप खेडकर प्रा .संजय कुलकर्णी उमेश पाटणकर, राकेश ठाकुर, प्रा.. राजेशपांडे सीमेश श्रॉफ श्याम शर्मा याचप्रमाणे पंजाबराव देशमुख मेडिकल रक्तपेढीची रक्त संकलन टीम उपस्थित होती.या शिबिरात १०० च्या जवळपास रक्तदात्यांनी रक्तदान करून रक्तदान शिबिराला भरघोस प्रतिसाद दिला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मंडळाचे कार्याध्यक्ष विलास इंगोले यांच्या मार्गदर्शनात मंडळाच्या सर्व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# वैद्यकीय महाविद्यालयासाठी आलियाबादची जागा बदलावी

## आ. सुलभाताई खोडके यांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२अमरावती-** अमरावती येथील प्रस्तावित शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयासाठी निश्चित करण्यात आलेली मौजे आलियाबाद येथील जागा वन विभागाच्या अखत्यारीत येत असल्याने ती बदलून शहराच्या मध्यवर्ती भागात पर्यायी जागा निश्चित करावी, अशी मागणी आमदार सुलभ खोडके यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना पत्र पाठवले आहे.पत्रात नमूद केल्याप्रमाणे, आलियाबाद येथील प्रस्तावित जागा 'आयडेंटिफाइड फॉरेस्ट' क्षेत्रात येत असल्याने केंद्र





सरकारच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणतेही वनेत्तर काम करता येत नाही. त्यामुळे कायदेशीर अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. तसेच ही जागा शहरापासून सुमारे १२ किमी अंतरावर असल्याने रुग्णांना, विशेषतः मेळघाटातील नागरिकांना, तेथे पोहोचणे गैरसोयीचे ठरणार आहे.शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचा उद्देश सर्वसामान्यांना सुलभ आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे हा असल्याने हे महाविद्यालय शहराच्या मध्यवर्ती भागातच असावे, अशी ठाम भूमिका आ. खोडके यांनी मांडली आहे. त्यांनी पर्यायी जागा म्हणून स्त्री रुग्णालय व सुपर स्पेशालिटी रुग्णालय परिसरातील सुमारे २३ एकर जागा, पंजाबराव कृषी विद्यापीठ परिसरातील जागा, रहाटगाव येथील जमीन तसेच कापूस पणन महासंघाची मध्यवर्ती जागा यांचा प्राधान्याने विचार करावा, असे सुचविले आहे.जनहित आणि तांत्रिक अडचणी लक्षात घेऊन आलियाबाद येथील जागेचा पुनर्विचार करून योग्य पर्यायी जागेस तातडीने मान्यता द्यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# बडनेरा येथे पंचशील नगरातून निघालेली भव्य धम्म रॅली



## सामाजिक एकतेचा प्रभावी संदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२बडनेरा -** बुद्ध जयंती निमित्त बडनेरा शहरात आयोजित करण्यात आलेली भव्य धम्म रॅली यंदा विशेष आकर्षण ठरली. पंचशील नगर येथील पंचशील बुद्ध विहारातून या रॅलीची उत्साहात सुरुवात झाली असून, संपूर्ण कार्यक्रमात पंचशील नगरचा सहभाग आणि नेतृत्व विशेष ठळकपणे दिसून आले.रॅलीची सुरुवात पंचशील नगरातून होत शिवाजी महाराज पुतळा, अशोक नगर, समता चौक परिसर, जयहिंद चौक या प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करण्यात आले. संपूर्ण मार्गावर जागोजागी नागरिकांनी रॅलीचे उत्स्फूर्त स्वागत केले, ज्यामुळे वातावरण अधिकच उत्साही आणि प्रेरणादायी बनले.यंदाच्या धम्म रॅलीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे पंचशील नगरातील युवा वर्ग आणि महिलांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग. युवकांनी शिस्तबद्ध रांगा, घोषवाक्ये आणि धम्म संदेशांद्वारे समाजाला जागरूक करण्याचे कार्य केले, तर महिलावर्गानेही उत्साहाने सहभाग घेत सामाजिक एकतेचा आदर्श घालून दिला.विशेष म्हणजे, बडनेरातील अनेक बुद्ध विहार मंडळांनीही या रॅलीत उत्साहाने सहभाग नोंदवला, ज्यामुळे रॅलीला व्यापक स्वरूप प्राप्त झाले आणि बौद्ध समाजातील एकजूट अधिक दृढ झाली.रॅली पूर्णतः शांततापूर्ण आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडली. सहभागी नागरिकांमध्ये महिला, पुरुष, युवक तसेच ज्येष्ठ नागरिकांचा मोठा सहभाग दिसून आला.

सर्वांनी मिळून बौद्ध धम्माचे विचार, बंधुता आणि सामाजिक समतेचा संदेश जनतेपर्यंत पोहोचवला.पंचशील नगरातील पंचशील बुद्ध विहार आणि स्थानिक युवा कार्यकर्त्यांनी या रॅलीच्या आयोजनात महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांच्या नियोजनामुळे संपूर्ण कार्यक्रम सुयोग्य पद्धतीने पार पडला.रॅलीदरम्यान विविध ठिकाणी चहा-नाश्ता व सेवा उपक्रम राबवण्यात आले, ज्यामुळे सहभागी नागरिकांना दिलासा मिळाला

# महिला महाविद्यालय (कनिष्ठ विभाग) उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२अमरावती-** स्थानिक नूतन विदर्भ शिक्षण मंडळ अमरावती द्वारा संचालित महिला महाविद्यालयाच्या कनिष्ठ विभागातील विद्यार्थिनींनी सत्र २०२५- २६ मध्ये बारावीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे व उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली आहे. महिला महाविद्यालयात कला ,वाणिज्य व विज्ञान या तीनही शाखा असून विद्यार्थिनींनी तिन्ही शाखेत उत्तम गुण मिळवून महाविद्यालयाचा लौकिक वाढविला आहे. महाविद्यालयाचा एकूण निकाल ९१.६३ % असून विज्ञान शाखेचा ९९.१०% ,वाणिज्य शाखेचा ८३.३३% तर कला शाखेचा ८५.४५% निकाल आहे. विज्ञान शाखेतून साची सुरेंद्र जयस्वाल(९१.१७%) ही प्रथम आली असून आशना शिरीष शिरभाते ,(८८.५०%) आणि अनुष्का अनिल लोखंडे(८७.००%) या अनुक्रमे द्वितीय व तृतीय आलेल्या आहे. वाणिज्य शाखेतून वेदिका दीपकराव मानकर ७७.८३ % ही प्रथम आणि वेदिका मधुकरराव गहूकर ७०.१७% ही द्वितीय आणि वंशिका मोहनराव दुर्गे ६८.८३% ही तृतीय आलेली आहे. तसेच कला शाखेतून ऐश्वर्या विनोद गडलिंग ७४.८३%, श्रावणी संजय सुराडकर ७३.८३%आणि मीनाक्षी मनोज कागदेवार ७३.३३ % ह्या अनुक्रमे प्रथम ,द्वितीय व तृतीय आलेल्या आहेत. याप्रसंगी सर्व विद्यार्थिनींनी त्यांच्या यशाचे श्रेय आपले गुरुजन आणि पालकांना दिले. प्राध्यापकांनी विद्यार्थिनींना योग्य मार्गदर्शन केल्यामुळेच विद्यार्थिनी हे यश संपादन करू शकल्या तसेच अभ्यासक्रमाबरोबरच महाविद्यालयात बारावीच्या विद्यार्थिनींकरिता राबविले जाणाऱ्या वेगवेगळ्या उपक्रमांचा तसेच टेस्ट सिरीज चा फायदा विद्यार्थिनींना झाल्याचे प्रांजळ मत पालकांनी आणि विद्यार्थिनींनी यावेळी व्यक्त केले. परीक्षेची तयारी तसेच व्यक्तिमत्व विकास या संदर्भात तज्ञ मार्गदर्शकां कडून आणि प्राचार्य डॉ. अरुणा वाडेकर यांच्या कडून विद्यार्थिनींना मिळालेले मार्गदर्शनही तेवढेच महत्त्वाचे होते असे आवर्जून पालकांनी सांगितले. महाविद्यालया च्या प्राचार्य डॉ. अरुणा वाडेकर यांनी सर्व कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांचे अभिनंदन आणि विद्यार्थिनींचे कौतुक केले. पालकांनी त्यांच्या पाल्यांकरिता महिला महाविद्यालयाची निवड केल्यामुळेच महाविद्यालयातील सर्व भौतिक सुविधा, सुसज्य ग्रंथालय ,दृकश्राव्य सोयी या सर्व बाबींचा विद्यार्थिनींना त्यांच्या अभ्यासाकरिता उपयोग होऊ शकला, याकरिता प्राचार्यांनी पालकांचे अभिनंदन केले. महिला महाविद्यालया ची पालकसंस्था नूतन विदर्भ शिक्षण मंडळाचे मा. अध्यक्ष .डव्होकेट श्री.आनंद परचुरे, संस्थेचे उपाध्यक्ष मा.श्री निनाद सोमण, मा.सचिव प्रा. हितेश व्यास व कार्यकारणीच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी देखील विद्यार्थिनींच्या यशाचे भरभरून कौतुक केले आहे. उपयुक्त सोयी सुविधा तसेच अभ्यासाला पोषक अशा सर्व बाबी संस्थेतर्फे विद्यार्थिनींना कायम पुरवल्या जातात. त्यामुळे महाविद्यालयात सर्वोच्च अध्यापन प्रक्रिया राबवली जाते असे कनिष्ठ महाविद्यालयाच्या पर्यवेक्षिका प्रा. माधुरी सोनपरोते यांनी सांगितले .कला व वाणिज्य शाखेच्या विद्यार्थिनींना महिला महाविद्यालयातच पीएचडी पर्यंतच्या शिक्षणाची संधी उपलब्ध असल्याने अनेक विद्यार्थिनींनी महिला महाविद्यालयातच प्रवेश घेण्याचा मनोदय यावेळी बोलून दाखविला. बारावी निकालाच्या बाबतीत विद्यार्थिनींनी उत्तम निकालाची परंपरा कायम राखल्याबद्दल सर्व स्तरातून विद्यार्थिनींचे अभिनंदन होत आहे.

# कॉपीमूक्त अभियानामुळे यंदा बारावीच्या निकालात
# २.९ टक्क्यांची घट, राज्य मंडळाची कबुली

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२अमरावती–** महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ म्हणजेच आज (२ मे २०२६) रोजी दुपारी १ वाजता बारावीचा निकालजाहीर झाला निकालाबरोबरच विद्यार्थ्यांना तात्पुरती गुणपत्रिका तसेच ई–मार्कशीट ऑनलाइन उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना घरबसल्या त्यांच्या निकालाची आणि गुणपत्रिकेची प्रत सहज डाउनलोड करता येणार आहे.

तत्पूर्वी महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून पत्रकार परिषद घेण्यात आली असून बारावीच्या निकालाची टक्केवारी जाहीर करण्यात आली आहे. मंडळाचे अध्यक्ष त्रिगुण कुलकर्णी यांनी सांगितले की, राज्यात यंदा कोकण विभाग आणि विद्यार्थ्यांपैकी मुलींनी निकालात बाजी मारली आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे (राज्य मंडळ) घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेचा निकाल ८९.७९ टक्के निकाल लागला. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा सुमारे २.९ टक्क्याने निकाल घटला आहे. राज्य मंडळाचे अध्यक्ष त्रिगुण कुलकर्णी यांनी सांगितले की, कॉपीमुक्त अभियान यावेळी चांगल्या पद्धतीने राबवले गेले, त्यामुळे कदाचित निकालात घट झाल्याचे दिसते.

प्रश्नपत्रिका फुटू नये म्हणून उच्च तंत्रज्ञान वापरल्याची माहिती त्रिगुण कुलकर्णी यांनी दिली. यावेळी बारामतीच्या



कस्टडीवरून केंद्रावर पेपर नेण्यासाठी जीपीएस आधारीत ट्रंक वापरली होती. ज्यामुळे कस्टडी ते केंद्रापर्यंत कुणीही प्रश्नपत्रिकेत छेडछाड करू नये, यासाठी ही खबरदारी घेण्यात आली.सर्व विभागीय मंडळातून मुलींनी बाजी मारली असून मुलींची उत्तीर्ण होण्याची टक्केवारी ९३.१५ टक्के आहे, तर मुलांची टक्केवारी ८६.८० टक्के आहे. म्हणजेच ६.३५ टक्के मुली मुलांपेक्षा अधिक उत्तीर्ण झालेल्या आहेत.

राज्याच्या नऊ विभागांपैकी लातूर विभागाचा सर्वात कमी निकाल लागला आहे. ८४.१४ टक्के इतका हा निकाल आहे. मागच्या वर्षीही लातूर विभागाचा सर्वात कमी निकाल होता.

राज्याच्या सर्व नऊ विभागातून कोकण विभाग टॉप असल्याची माहिती मंडळाचे अध्यक्ष त्रिगुण कुलकर्णी यांनी दिली. कोकण विभागाचा निकाल ९४.१४ टक्के इतका लागल आहे.

५०,३४६ विद्यार्थ्यांनी पुन्हा परीक्षा दिली होती. त्यापैकी १८,३४९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. ३६.४४ टक्के उत्तीर्ण झाले आहेत.

यंदा बारावीच्या परीक्षेला फॉर्म १७ भरून ३६,९४१ खासगी विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यापैकी २९,६३४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून उत्तीर्ण होण्याची टक्केवारी ८०.२१ टक्के इतकी आहे, अशी माहिती राज्य मंडळाचे अध्यक्ष त्रिगुण कुलकर्णी यांनी दिली.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे (राज्य मंडळ) घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेचा निकाल ८९.७९ टक्के निकाल लागला.

# अकोल्यात उद्या 'हिंदू राष्ट्र जागृती सभा'

## अमरावतीतून शेकडो धर्मप्रेमी सहभागी होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२अमरावती –** अकोला येथे उद्या रविवार (दि. ३ मे २०२६) रोजी सायंकाळी ६ वाजता माधव नगर परिसरातील एकविरा मैदानावर 'हिंदू राष्ट्र जागृती सभा'चे आयोजन करण्यात आले आहे. या सभेला अमरावती जिल्ह्यातून शेकडो धर्मप्रेमी उपस्थित राहणार असल्याची माहिती आयोजकांकडून देण्यात आली आहे. हिंदुत्वाचा प्रचार व हिंदू समाजातील विविध प्रश्नांवर जनजागृती करण्याच्या उद्देशाने ही सभा आयोजित करण्यात आली आहे.हिंदू जनजागृती समिती चे अमरावती जिल्हा समन्वयक सचिन वैद्य यांनी जिल्ह्यातील मंदिर संस्था,




व्यापारी संघटना आणि विविध गटांच्या भेटी घेऊन नागरिकांना मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

या सभेचे प्रमुख आकर्षण म्हणजे तेलंगणातील भाग्यनगर (हैदराबाद) येथील आमदार टी राजा यांची उपस्थिती राहणार आहे. तसेच सनातन संस्था च्या धर्मप्रचारक स्वाती खाडये आणि संघटक सुनील घनवट यांचेही मार्गदर्शन लाभणार आहे.

हिंदू समाजासमोरील विविध सामाजिक व धार्मिक प्रश्नांवर विचारमंथन करण्यासाठी ही सभा महत्त्वाची ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या हिंदवी स्वराज्याच्या आदर्शावर आधारित समाजरचना उभारण्याचा संदेश या सभेतून दिला जाणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

# उष्णतेचा तडाखा आणि घसरलेले दर

## भाजीपाला व फळपिकांवर दुहेरी संकट



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२अमरावती–** पश्चिम विदर्भासह परिसरात वाढलेल्या प्रचंड उष्णतेचा फटका शेतकऱ्यांच्या भाजीपाला व फळपिकांना बसत असून टोमॅटो, टरबूज, पपई, वांगे आणि कांदा या पिकांची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. एकीकडे उष्णतेमुळे पिकांचे नुकसान होत असताना दुसरीकडे बाजारभाव कोसळल्याने शेतकऱ्यांवर दुहेरी संकट ओढवले आहे.टरबूज पिकावर उष्णतेचा मोठा परिणाम दिसून येत असून फळांवर पांढरे डाग पडत आहेत, तर वेली सुकत आहेत. टरबूजाला सध्या केवळ चार रुपये किलो असा ठोक भाव मिळत असल्याने उत्पादन खर्चही निघत नाही. टोमॅटोची परिस्थितीही तितकीच गंभीर असून २५ किलोच्या क्रेटला अवघे १०० रुपये दर मिळत आहे. तोडणी व वाहतूक खर्चही निघत नसल्याने अनेक शेतकऱ्यांनी टोमॅटो तोडणी बंद केली आहे.वांग्याला २० किलो पन्नीमागे ३० ते ४० रुपये दर मिळत असून यातूनही खर्च भागत नाही. पपईसारख्या नाजूक पिकाला एक ते दोन रुपये किलो दर मिळत असल्याने शेतकऱ्यांना मोठा तोटा सहन करावा लागत आहे.रखरखत्या उन्हात पिकांची देखभाल, पाणीपुरवठा आणि तोडणीसाठी मोठी मेहनत घ्यावी लागत असतानाही बाजारभाव घसरल्याने शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी झाली आहे. अनेक ठिकाणी पिके शेतातच पडून राहत असून काही ठिकाणी जंगली प्राण्यांकडूनही नुकसान होत आहे. त्यामुळे शासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

# कार्यपुस्तिका हाती; उन्हाळी सुटीत अभ्यासाची गोडी !

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२अमरावती**




उन्हाळी सुटी लागली की विद्यार्थ्यांचा अभ्यासाशी असलेला संपर्क तुटतो आणि अभ्यासात खंड पडतो, ही समस्या आता दूर होणार आहे. राज्याच्या शिक्षण विभागाने एक स्तुत्य उपक्रम हाती घेतला असून, प्राथमिक जिल्ह्यातील शाळेतील विद्यार्थ्यांचा अभ्यासा चा सराव सुटीतही सुरू राहावा, यासाठी (वर्कबुक) देण्याचा निर्णय घेतला आहे. या उपक्रमांतर्गत जिल्ह्यात तब्बल ५२ हजार कार्यपुस्तिकांचे वाटप केले आहे.शाळांना उन्हाळी सुटी असली तरी विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती खुंटू नये, यासाठी हे विशेष नियोजन करण्यात आले आहे. प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांची वाचन, लेखन आणि गणितीय कौशल्ये विकसित करण्यासाठी या कार्यपुस्तिका तयार करण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांना या पुस्तिका घरी सोडवण्यासाठी दिल्या जाणार असून, यामुळे सुटीतही त्यांना अभ्यासाची उजळणी करता येणार आहे. जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये कार्यपुस्तिकांचे वितरण करण्यात आले असून विद्यार्थ्यांनी सरावही सुरू केला आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासात खंड पडणार नाही, अशी भावना पालक व्यक्त करत आहेत.

### नवीन सत्रात शिक्षक घेणार प्रगतीचा आढावा

१) कार्यपुस्तिकांमध्ये विविध प्रकारचे उपक्रम, कोडी आणि सरावासाठी प्रश्न आहेत, जे मुलांचे तर्कशास्त्र आणि भाषिक कौशल्य वाढवण्यास मदत करतील. घरच्या घरी पालकांच्या मार्गदर्शनाखाली किंवा स्वयंप्रेरणेने विद्यार्थी हे उपक्रम पूर्ण करू शकतील, अशा पद्धतीने या पुस्तिकांची रचना केली आहे.

२)शाळा सुरू झाल्यावर शिक्षक या पुस्तिका तपासून विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा आढावा घेणार आहेत. ज्यामुळे पुढील वर्गातील अभ्यासाचा पाया भक्कम होईल. शिवाय विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक सत्रातील अभ्यासक्रमाबाबत प्रत्याभरण मिळेल.

# विद्युत खांबांवरील ॲल्युमिनियम तार चोरी करणारी टोळी जेरबंद

## ५.२० लाखांचा मुद्देमाल जप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२अमरावती–** ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेने विद्युत खांबांवरील ॲल्युमिनियम तार चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करत चार आरोपींना अटक केली आहे. या कारवाईत एकूण ५ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये शेख अन्सार शेख सत्तार (वय ५२), शुभम भाऊराव उताणे (वय २९), कृष्णा शंकरराव रायकवार (वय २०) आणि सचिन भाऊराव उताणे (वय ३६) यांचा समावेश आहे. सर्व आरोपी अमरावती परिसरातील रहिवासी आहेत.

या प्रकरणी सहाय्यक अभियंता सुदाम गजानन पाकधाणे यांनी लोणी पोलीस



ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, माहुली ते कोठोडा रस्त्यावर तसेच धारफळ शेतशिवारात अज्ञात चोरट्यांनी विद्युत खांब पाडून सुमारे ३८०० मीटर ॲल्युमिनियम तार चोरी केली होती. याची किंमत सुमारे ७२ हजार रुपये होती.पोलीस उपनिरीक्षक मुलचंद भांबुरकर व त्यांच्या पथकाने गुप्त माहितीच्या आधारे शुभम उताणे याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने साथीदारांसह गुन्ह्याची कबुली दिली. आरोपी रात्रीच्या वेळी टवेरा वाहनातून जाऊन दोरीच्या साहाय्याने सिमेंट खांब पाडून तार चोरी करत असल्याचे उघड झाले. चोरीचा माल त्यांनी अमरावतीतील व्यापाऱ्याला विक्री केल्याचेही समोर आले.

या टोळीने लोणी, मंगरुळ चव्हाळा व बडनेरा परिसरात अशाच प्रकारचे एकूण चार गुन्हे केल्याची कबुली दिली आहे. पोलिसांनी गुन्ह्यात वापरलेले वाहन व मोबाईलसह मुद्देमाल जप्त केला असून पुढील तपास सुरू आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# २ कोटींपेक्षा अधिक किमतीचा अंमली पदार्थ जाळून नष्ट

## अमरावती पोलीसांची मोठी कारवाई

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२अमरावती–** अमरावती शहर पोलीस आयुक्तालयाने अंमली पदार्थांविरोधात मोठी कारवाई करत तब्बल २,०३,७५,००० रुपयांचा गांजा, चरस आणि एमडी (मेफेड्रोन) असा मुद्देमाल जाळून नष्ट केला. ही कारवाई २ मे २०२६ रोजी महाराष्ट्र एनवायरो पॉवर लिमिटेड येथे करण्यात आली.

एनडीपीएस ॲक्ट १९८५ अंतर्गत दाखल ५८ गुन्ह्यांमधील हा मुद्देमाल होता. यात ३६८.४३ किलो गांजा, १.५५१ किलो चरस आणि १.२५३ किलो एमडीचा समावेश होता. न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर या सर्व प्रकरणांतील जप्त अंमली पदार्थ नष्ट करण्याचा निर्णय घेण्यात आला.

या ५८ प्रकरणांमध्ये नागपुरी गेट (१६), बडनेरा (१३), गाडगेनगर (११), खोलापुरी गेट (३), नांदगाव पेठ (६), फ्रेजरपुरा (४), वलगाव (२), सिटी कोतवाली (२) आणि राजापेठ (१) या पोलीस ठाण्यांचा समावेश होता. सन १९९६ पासून नोंद असलेल्या या प्रकरणांचा न्यायालयीन निकाल लागल्यानंतर पुढील कारवाई करण्यात आली.



या मोहिमेसाठी पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय ड्रग डिस्पोजल समिती स्थापन करण्यात आली होती. यामध्ये पोलीस उपायुक्त श्याम घुगे आणि पोलीस उपायुक्त (मुख्यालय) रमेश धुमाळ यांचा समावेश होता. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून आवश्यक परवानगी मिळाल्यानंतर हा मुद्देमाल नागपूर येथील बुटीबोरी एमआयडीसीमध्ये नेऊन इन्सिनरेटरच्या साहाय्याने नष्ट करण्यात आला.

ही कारवाई ड्रग डिस्पोजल समिती, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी, कंपनीचे प्रतिनिधी, पंच आणि पोलीस अधिकारी यांच्या उपस्थितीत पार पडली. या मोहिमेमुळे अंमली पदार्थांविरोधातील कारवाईला अधिक बळ मिळाले असून समाजात सकारात्मक संदेश गेला आहे.

# नेर तालुक्यातील पारधी बेड्यावर उष्माघाताने बालिकेचा मृत्यू!

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२ नेर –** संपूर्ण विदर्भासह यवतमाळ जिल्ह्यात सध्या सूर्याचा आगडोंब उसळला असून, पाणीटंचाईमुळे उष्माघाताचा पहिला बळी गेल्याची चर्चा आहे. नेर तालुक्यातील अजंती पारधी बेडा येथील एका नऊ वर्षीय चिमुकलीचा शुक्रवारी सायंकाळी अचानक मृत्यू झाला असून, तिचा मृत्यू उष्माघाताने झाल्याचा प्राथमिक संशय व्यक्त केला जात आहे. अनवी अनाडी भोसले (९), असे मृत मुलीचे नाव आहे.



**पाण्यासाठी पायपीट आणि नंतर मृत्यू–** मिळालेल्या माहितीनुसार, नेर तालुक्यातील अजंती पारधी बेडा परिसरात सध्या भीषण पाणीटंचाई जाणवत आहे. चिमुकली अनवी शुक्रवारी रणरणत्या उन्हात पाणी आणण्यासाठी गेली होती. दिवसभर उन्हात तिची पायपीट झाली. त्यानंतर सायंकाळच्या सुमारास तिला अचानक चक्कर आली आणि ती जागीच कोसळली. कुटुंबियांनी तिला तातडीने रुग्णालयात हलवले, मात्र उपचारापूर्वीच तिचा मृत्यू झाला.

**वैद्यकीय प्रशासनाची भूमिका**

या घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. 'अनवीला आधीपासून काही आजार, ताप किंवा फिट येण्याचा त्रास होता का, याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत माहिती नाही. बालिकेचा मृत्यू नेमका कशामुळे झाला, हे शवविच्छेदन अहवाल प्राप्त झाल्याशिवाय स्पष्टपणे सांगता येणार नाही. मात्र पालकांनी शव विच्छेदनाची परवानगी दिली तरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होईल', असे जिल्हा आरोग्य अधिकारी सुभाष ढोले यांनी सांगितले. अजंती पारधी बेडा येथे आरोग्य विभागाचे पथक रवाना झाले आहे. पाण्यासाठी एका बालिकेचा बळी गेल्यानंतर पाणीटंचाईबाबत जिल्हा प्रशासन काय निर्णय घेते, याकडे बेड्याचे लक्ष लागले आहे.

# गाडगेनगर पोलिसांची मोठी कारवाई

## २.०४ लाखांचा अवैध दारूसाठा जप्त

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२अमरावती**

अमरावती शहरातील गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या डी.बी. पथकाने महाराष्ट्र दिनाच्या पार्श्वभूमीवर मोठी कारवाई करत अवैध देशी–विदेशी दारू साठा जप्त केला. या कारवाईत एकूण २ लाख ४ हजार ८१० रुपयांचा दारूसाठा हस्तगत करण्यात आला असून अशोक महावीर पटेल (वय ६०, रा. विलासनगर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १ मे रोजी सकाळी पेट्रोलिंगदरम्यान मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी विलासनगर परिसरात छापा टाकला. आरोपीच्या घरातून विविध कंपन्यांच्या देशी व विदेशी दारूच्या बाटल्या मोठ्या प्रमाणात विक्रीसाठी साठवून ठेवल्याचे आढळून आले. यात रॉयल स्टॅग, ऑफिसर्स चॉइस, इम्पीरियल ब्लू, मॅकडॉवेल्स, ट्युबॉर्ग, किंगफिशर आदी ब्रँडच्या बाटल्यांचा समावेश आहे.



सदर प्रकरणी महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये कलम ६५(ई), ६६ अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, उपायुक्त गणेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव यांच्या नेतृत्वात डी.बी. पथकाने केली. पुढील तपास पोउपनि सागर ठाकरे करीत आहेत.

# कामगार दिनानिमित्त सफाई कामगारांचा राणा दाम्पत्यांकडून सन्मान

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२अमरावती**

कामगार दिनाचे औचित्य साधत आमदार रवी राणा व भाजपा नेत्या माजी खासदार नवनीत राणा यांनी शहरातील सफाई कामगारांचा शाल व श्रीफळ देऊन सन्मान करत त्यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. शंकर नगर येथील कार्यालयात आयोजित या कार्यक्रमाचे आयोजन नगरसेवक प्रा. प्रशांत वानखडे, नगरसेविका नंदा सावदे व नगरसेवक महेश मुलचंदानी यांनी केले होते.यावेळी बोलताना आमदार रवी राणा यांनी सफाई कामगारांचे महत्त्व अधोरेखित करत सांगितले की, सफाई कामगार हे शहराच्या आरोग्याचे खरे शिल्पकार आहेत. त्यांच्या मेहनतीमुळे शहर स्वच्छ व निरोगी राहते. त्यांचा सन्मान करणे ही आपली जबाबदारी आहे.तर नवनीत रवी राणा यांनी आपल्या मनोगतात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भूमीत जन्माला आलो हे भाग्य असल्याचे सांगत कामगार सन्मानाचे महत्त्व अधोरेखित केले. त्या



म्हणाल्या की, देशाचे पंतप्रधान नरेन्द्र भाई मोदी यांनी कामगारांचा सन्मान करून त्यांना प्रतिष्ठा दिली आहे. सफाई कामगारांचा गौरव करणे हे आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे.या कार्यक्रमाला अंजनगाव सुर्जीचे नगराध्यक्ष अविनाश गायगोले, नगरसेवक प्रा. प्रशांत वानखडे, नगरसेविका नंदा सावदे, महेश मुलचंदानी, नितीन बोरेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. विविध भागांत कार्यरत असलेल्या सफाई कामगारांचा यावेळी सत्कार करण्यात आला.कार्यक्रमादरम्यान कामगारांच्या चेहऱ्यावर समाधानाचे भाव दिसून आले.

# शिवसेना (शिंदे गट) मध्ये प्रवेशानंतर बच्चू कडू यांचे अमरावतीत दणक्यात स्वागत

## बेलोरा येथे आई-वडिलांच्या समाधीला नतमस्तक होऊन नव्या राजकीय प्रवासाची सुरुवात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

अमरावती जिल्ह्यात प्रहार जनशक्ती पक्षाचे प्रमुख बच्चू कडू यांचे शिवसेनेत (शिंदे गट) मध्ये प्रवेशानंतर दणक्यात स्वागत करण्यात आले. ३० एप्रिल २०२६ रोजी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत त्यांनी अधिकृतपणे शिवसेनेत प्रवेश केला.







या राजकीय घडामोडीनंतर प्रथमच जिल्ह्यात आगमन होताच कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

जिल्ह्यात दाखल होताच बच्चू कडू यांनी आपल्या मूळ गावी बेलोरा येथे जाऊन आई-वडिलांच्या समाधीला नतमस्तक होत नव्या राजकीय प्रवासाची सुरुवात केली. तत्पूर्वी बच्चू कडू यांच्या पत्नी नयना कडू यांनी बचू कडू यांचे औक्षवण केले. या भावनिक क्षणाला उपस्थित कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली होती. गावात त्यांच्या स्वागतासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. फटाक्यांची आतषबाजी, ढोल-ताशांचा गजर आणि घोषणांनी बेलोरा परिसर दुमदुमून गेला होता.

यानंतर अमरावती शहरात भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले. रॅलीची सुरुवात नेहरू मैदान येथून करण्यात आली. शहरातील विविध भागांतून मार्गक्रमण करत रॅली अंबादेवी मंदिर येथे पोहोचली, जिथे बच्चू कडू यांनी महाआरती करून दर्शन घेतले. त्यानंतर गजयस्तंभ चौक येथे महात्मा गांधी यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला.

रॅली पुढे खइर्विन चौक येथे पोहोचली, जिथे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला माल्यार्पण करण्यात आले. त्यानंतर बच्चू कडू यांनी संत गाडगे बाबा गाडगेनगर येथे जाऊन त्यांच्या समाधीचे दर्शन घेतले आणि समाजसेवेच्या कार्याला पुढे नेण्याचा संकल्प व्यक्त केला.

संपूर्ण रॅलीदरम्यान जय भवानी, जय शिवाजीच्या घोषणांनी वातावरण भारावून गेले होते. समर्थकांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला होता. युवक, महिला आणि विविध सामाजिक संघटनांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा उत्साह आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महत्त्वाचा मानला जात आहे.

शेवटी बच्चू कडू चांदूर बाजारकडे रवाना झाले. त्यांच्या या दौऱ्यामुळे जिल्ह्यातील राजकीय समीकरणांमध्ये बदल होण्याची चर्चा सुरू झाली आहे. शिवसेनेत प्रवेशानंतर बच्चू कडू यांची ताकद वाढल्याचे चित्र दिसत असून, आगामी निवडणुकांमध्ये याचा मोठा परिणाम होण्याची शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त केली जात आहे.

## माजी सरन्यायाधीश भूषण गवईंच्या दौऱ्याला आंबेडकरी संघटनांचा तीव्र विरोध, शहरात लागलेले फलक फाडले...

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२यवतमाळ–** भारताचे माजी सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या यवतमाळ दौऱ्यावरून जिल्ह्यात राजकीय आणि सामाजिक वातावरण कमालीचे तापले आहे.बागेश्वर धामचे धीरेंद्र शास्त्री यांची भेट घेतल्याने आणि अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरणाच्या मुद्द्यावरून आंबेडकरी संघटनांनी न्या. गवई यांच्याविरुद्ध आक्रमक पवित्रा घेतला असून, शुक्रवारी शहरात ठिकठिकाणी लावलेले त्यांचे स्वागत फलक कार्यकर्त्यांनी फाडून टाकले. या वाढत्या तणावामुळे न्या. गवई यांचा आजचा यवतमाळ दौरा रद्द होणार का, अशा चर्चांना उधाण आले आहे. स्थानिक जवाहरलाल दर्डा विधी महाविद्यालयाच्या कार्यक्रमा साठी न्या. गवई येणार असल्याने शहरात त्यांच्या स्वागताचे मोठे बॅनर लावण्यात आले होते. यामुळे संतप्त झालेल्या आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांनी ज्या वकिलांनी हे फलक लावले होते, थेट त्यांच्या घरावर धडक दिली. 'समाजद्रोही काम करणाऱ्यांचे स्वागत कसे करता?', असा जाब विचारत कार्यकर्त्यांनी संबंधित विधीज्ञांना धारेवर धरले. अनुसूचित




जातीच्या उपवर्गीकरणाचा मुद्दा गरम असताना असे कृत्य समाज सहन करणार नाही, अशी तंबी दिल्यानंतर संबंधित वकिलांनी तातडीने ते बॅनर उतरवण्याची हमी दिली. ड. जयसिंह चव्हाण, उमेश मेश्राम, प्रमोदिनी रामटेके यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी स्वतः उभे राहून हे बॅनर खाली उतरवले.

दरम्यान आज शनिवारी सायंकाळी स्थानिक विधी महाविद्यालयात ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी जवाहरलाल दर्डा यांच्या पुतळ्याच्या अनावरण सोहळ्यासाठी न्या. भूषण गवई हे मुख्य अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाला पालकमंत्री संजय राठोड, खासदार संजय देशमुख आणि विविध उच्च न्यायालयाचे न्यायाधीश उपस्थित राहणार आहेत. परंतु, शहरातील आंबेडकरी चळवळीच्या कार्यकर्त्यांनी न्या. भूषण गवई यांच्या विरोधात आक्रमक भूमिका घेतल्याने गवई यांच्या दौऱ्यावर अनिश्चिततेचे सावट आहे.

## बसस्थानकांवर 'नाथजल'चा तुटवडा

### उपलब्ध ठिकाणी ५ रुपयांनी जादा वसुली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

राज्य मार्ग परिवहन महामंडळाने प्रवाशांना स्वस्त व शुद्ध पाणी उपलब्ध व्हावे या उद्देशाने 'नाथजल' या बाटलीबंद पाण्याची योजना सुरू केली असली, तरी प्रत्यक्षात बसस्थानकांवर याचे चित्र वेगळेच दिसत आहे. अनेक




ठिकाणी 'नाथजल'चा पुरवठा वेळेवर होत नसल्याने प्रवाशांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. तर ज्या ठिकाणी हे पाणी उपलब्ध आहे, तिथे अधिकृत १५ रुपयांऐवजी २० रुपये आकारले जात असल्याने प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

महामंडळाने 'नाथजल'ची १५ रुपयांची निश्चित किंमत ठरवून इतर कंपन्यांच्या पाण्याच्या बाटल्या विक्रीस मनाई केली आहे. मात्र, प्रत्यक्षात अनेक बसस्थानके आणि थांब्यांवर नाथजल उपलब्ध नसल्याने विक्रेते इतर कंपन्यांचे पाणी विकताना दिसतात.

त्यामुळे प्रवाशांना पर्याय नसल्याने जादा दराने पाणी घ्यावे लागत आहे.विशेष म्हणजे, काही ठिकाणी 'कुलिंग चार्ज'च्या नावाखाली अतिरिक्त ५ रुपये आकारले जात असल्याचे प्रकार समोर आले आहेत.

परंतु, बाटलीबंद पाण्यावर छापलेल्या एमआरपीपेक्षा अधिक दर घेणे नियमबाह्य असल्याचे प्रवाशांचे म्हणणे आहे. यामुळे दररोज प्रवास करणाऱ्या नागरिकांच्या खिशाला कात्री लागत असून, प्रशासनाच्या नियंत्रणाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. प्रवाशांच्या तक्रारींसाठी एसटी महामंडळाने २४ तास हेल्पलाइन (१८०० २२ १२५०) सुरू ठेवली आहे. नाथजल उपलब्ध नसणे किंवा जादा दराने विक्री होत असल्यास प्रवाशांनी बसस्थानकाचे नाव, स्टॉलची माहिती व तक्रार नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

प्रशासनाने नाथजलची सक्ती केली असली, तरी त्याचा नियमित पुरवठा आणि ठरलेल्या दरात विक्री सुनिश्चित करणे ही त्यांची जबाबदारी आहे. अन्यथा, प्रवाशांची होणारी आर्थिक फसवणूक थांबवण्यासाठी कडक कारवाईची मागणी होत आहे.–

## मोठ्या कंपन्यांत कामाचा अनुभव;९ हजारांचे विद्यावेतनही मिळणार

### ५ हजार रुपये थेट जमा होणार उमेदवाराच्या खात्यात : शासनाची योजना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती–**

देशातील युवकांच्या हाताला काम मिळावे आणि त्यांना कॉर्पोरेट क्षेत्रातील प्रत्यक्ष कामाचा अनुभव यावा, यासाठी केंद्र सरकारने 'प्रधानमंत्री इंटर्नशिप योजना' सुरू केली आहे.

या योजनेचा आता तिसरा टप्पा सुरू झाला असून, याद्वारे हजारो तरुणांना देशातील आघाडीच्या ५०० कंपन्यांमध्ये काम करण्याची संधी मिळणार आहे.विशेष म्हणजे, या काळात उमेदवारांना आर्थिक ओढाताण सोसावी लागू नये, म्हणून आकर्षक विद्यावेतनही दिले जाणार आहे.

बोल्ड करणे)काय आहे प्रधानमंत्री इंटर्नशिप योजना?

ही केंद्र सरकारची योजना असून, ज्या तरुणांकडे पदवी किंवा डिप्लोमा आहे; पण प्रत्यक्ष कामाचा अनुभव नाही, अशांना उद्योगजगताशी जोडण्याचे हे एक माध्यम आहे. व्यावसायिक कौशल्ये आत्मसात करून युवकांची रोजगार क्षमता वाढवणे, हा यामागचा मुख्य उद्देश आहे.

**इंटर्नशिपनंतर प्रमाणपत्रही**

इंटर्नशिपचा कालावधी यशस्वीरीत्या पूर्ण केल्यानंतर उमेदवारांना केंद्र सरकार आणि संबंधित कंपनीकडून प्ररगपत्र दिले जाते. या प्रमाणपत्राचा उपयोग भविष्यात कायमस्वरूपी नोकरी मिळवण्यासाठी महत्त्वाचा ठरतो.

**९ हजार रुपयांपर्यंत दरमहा विद्यावेतन**

निवड झालेल्या उमेदवारांना आर्थिक आधार म्हणून दरमहा २ हजार रुपये विद्यावेतन दिले जाते. यातील ५ हजार रुपये सरकार थेट उमेदवाराच्या खात्यात जमा करते. उर्वरित ४ हजार रुपये संबंधित कंपनीकडून दिले जातात.

### कुठे आणि कसा करायचा अर्ज ?

इच्छुक उमेदवारांनी.ाळिपींशीपीहळी.लिर.सीें.ळप येथे नोंदणी करून आपले शिक्षण आणि आवडीच्या क्षेत्रानुसार कंपन्यांची निवड करावी लागते. अधिक माहितीसाठी कार्यालयाशी संपर्क साधावा, अशी माहिती देण्यात आली आहे. दरम्यान, भारत सरकारच्या कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयामार्फत ही योजना राबविण्यात येत आहे. पोर्टलवर अर्ज केल्यानंतर पात्रनुसार उमेदवाराची निवड करण्यात येणार आहे.

### पात्रता आणि निकष काय?

उमेदवाराचे वय २१ ते २४ वर्षे यादरम्यान असावे. उमेदवार दहावी, बारावी उत्तीर्ण असावा किंवा त्याच्याकडे आयटीआय, पॉलिटेक्निक डिप्लोमा, अथवा बीए, बीकॉम, बीएस्सी बीफार्म यांसारखी पदवी असावी. सरकारी नोकरीत असणाऱ्यांना लाभमिळणार नाही. जिल्ह्यात योजनेबाबतजागृती करण्यासाठी प्रशासनाकडून पोर्टलची माहिती सार्वजनिक करण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

## युद्धाचा फटका रस्त्यांना डांबर दरवाढीमुळे कामे ठप्प

### पावसाळ्यापूर्वीची डागडुजीही धोक्यात

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२अमरावती**

आखाती भागात सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कच्च्या तेलाच्या पुरवठ्यावर मोठा परिणाम झाला असून, त्याचा थेट फटका जिल्ह्यातील रस्तेनिर्मिती आणि दुरुस्तीच्या कामांना बसत आहे. डांबर, फर्नेस ऑइलसह विविध पेट्रोलियम उत्पादनांच्या किमतीत झालेल्या वाढीमुळे बांधकाम क्षेत्रातील खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे. परिणामी अनेक रस्ते प्रकल्पांचा वेग मंदावला असून, काही कामे थंडावण्याच्या मार्गावर आहेत.आखाती युद्धामुळे आयात साखळी विस्कळीत झाली आहे. डांबरासारख्या महत्त्वाच्या कच्च्या मालाचा पुरवठा घटल्याने बाजारात तुटवडा निर्माण झाला आहे. यामुळे कंत्राटदारांसमोर मोठे आर्थिक आव्हान उभे ठाकले आहे. जुन्या दराने घेतलेली कामे सध्याच्या वाढीव खर्चात पूर्ण करणे कठीण होत असल्याने अनेक कंत्राटदारांनी कामाचा वेग कमी केला आहे.दरम्यान, पेट्रोलियम उत्पादनांच्या दरवाढीचा परिणाम फक्त डांबरापुरता मर्यादित नसून वाहतूक खर्च, यंत्रसामग्री वापर आणि मजुरीवरही झाला आहे. त्यामुळे प्रकल्पांचा एकूण खर्च गगनाला भिडला आहे. सरकारकडून मंजूर झालेल्या निधीमध्ये काम पूर्ण करणे अवघड बनले असून, निधी पुनर्मूल्यांकनाची गरज निर्माण झाली आहे.जिल्ह्यात सध्या सुरू असलेल्या रस्तेबांधणी प्रकल्पांनाही या परिस्थितीचा मोठा फटका बसत आहे. ग्रामीण तसेच शहरी भागातील अनेक रस्त्यांची कामे संथ गतीने सुरू असून, काही ठिकाणी कामे थांबण्याच्या स्थितीत आहेत. कंत्राटदारांना



आर्थिक तोटा सहन करावा लागत असल्याने ते नवीन कामे स्वीकारण्यासही मागे हटत आहेत.विशेष म्हणजे, दरवर्षी पावसाळ्यापूर्वी करण्यात येणारी रस्त्यांची डागडुजी यंदा धोक्यात आली आहे. खड्डे बुजविणे, डांबर टाकणे यांसारखी नियमित कामे दरवाढीमुळे लांबणीवर पडण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. त्यामुळे पावसाळ्यात नागरिकांना खड्डेमय रस्त्यांचा अधिक त्रास सहन करावा लागू शकतो.सध्या बांधकाम विभागाकडून परिस्थितीचा आढावा घेतला जात असून, उपलब्ध निधी असलेल्या कामांना प्राधान्य दिले जात आहे. मात्र युद्धस्थिती दीर्घकाळ कायम राहिल्यास रस्ते प्रकल्प पूर्णपणे ठप्प होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे शासनाने तातडीने उपाययोजना करून दरवाढीचा ताण कमी करावा, अशी मागणी नागरिक आणि कंत्राटदारांकडून होत आहे.

## मतदार यादी शुद्धीकरणात सुनांची कोंडी ; धुंडाळताहेत २००२ च्या नोंदी

### नोंदी शोधताना तारांबळ : विवाहानंतर स्थलांतरित महिलांची होतेय धावपळ

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२अमरावती–** निवडणूक आयोगाच्या मतदारविशेष पुनरावलोकन कार्यक्रमांतर्गत राज्यभर मतदार यादी पडताळणी मोहीम सुरू आहे. २०२४ च्या मतदार यादीचे २००२ च्या जुन्या यादीशी मॅपिंग सुरू असल्याने



नागरिकांना जुन्या नोंदी शोधाव्या लागत आहेत. या प्रक्रियेमुळे विशेषतः लग्न होऊन सासरी गेलेल्या लेकी-सुनांची मोठी अडचण निर्माण झाली आहे. अनेक महिलांना मतदार यादीतील नाव निश्चित करण्यासाठी माहेराकडे धाव घ्यावी लागत आहे. विविध कागदपत्रे व जुने पुरावे सादर करण्याची वेळ आली आहे. बीएलओंकडून घरोघरी पडताळणी केली जात आहे. काही ठिकाणी नाव वगळले जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे. प्रशासनाकडून मॅपिंग प्रक्रिया वेगाने सुरू आहे. निवडणूक आयोगाने ही मोहीम मतदार यादी शुद्धीकरणासाठी सुरू केल्याचे सांगितले जात आहे.जुनी नोंद न सापडल्यास नाव वगळले जाऊ शकते. अपूर्ण माहिती असल्यास पुनर्पडताळणी आवश्यक आहे. नागरिकांनी तातडीने कागदपत्रे सादर करावीत, असे आवाहन करण्यात आले आहे.

**आवश्यक कागदपत्रे**

जन्म दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, आधार कार्ड, जुने मतदार ओळखपत्र, राहण्याचा पुरावा व विवाह प्रमाणपत्र आदी कागदपत्रे आवश्यक आहे. बीएलओंकडून यासंदर्भात चौकशी केली जात आहे.–


